**प्रश्न-१ पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१) बौध भिक्खू सतत भ्रमण करीत.
२) मार्को पोलो मुळे युरोप व आशिया यांच्यात संवाद व व्यापार सुरू झाला.
३) गेरहार्ट मर्केटरमुळे युरोपातील शोध मोहिमांना गती मिळाली.
४) विष्णूभट गोडसे लिखित 'माझा प्रवास' हे इतिहासाचे साधन आहे.
५) स्थानिक व आंतरराष्ट्रीय पर्यटन प्रवास सुलभ असतो.
६) आंतरराष्ट्रीय पर्यटन वाढले पाहिजे.
७) भारतातील आरोग्य-पर्यटनाला चांगले दिवस आले आहेत.
८) क्रीडा पर्यटन हा नव्याने उदयाला आलेला प्रकार आहे.
९) पर्यटनामुळे अनेक लोकांना रोजगाराची संधी निर्माण होते.
१०) देशी-विदेशी पर्यटकांचे उद्‌बोधन करणे अवश्यक आहे.
११) पर्यटन केंद्राच्या परिसरात बाजारपेठांचा विस्तार होतो.
१२) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली.
१३) आपण आपला नैसर्गिक व सांस्कृतिक वारसा जपला पाहिजे.

**प्रश्न-२ रा. थोडक्यात उत्तरे द्‌या**

१) कोण-कोणत्या निमित्तांनी पूर्वी पर्यटन घडून येत असे?
२) गौतम बुद्ध, बौध भिक्खू भारतभर सतत भ्रमण का करीत?
३) पर्यटन म्हणजे काय? आधुनिक पर्यटन युगाची सुरुवात कशी झाली?
४) जगातील पहिला युरोपीय शोधक प्रवासी कोण? तो पहिला युरोपीय शोधक प्रवासी म्हणून का ओळखला जाऊ लागला?
५) मार्को पोलो या इटालीयन प्रवाशाने कोणती कामगिरी केली?
६) इल बतुता कशासाठी प्रसिध्द आहे?
७) गेरहार्ट मार्केटर कशासाठी प्रसिध्द आहे?
८) विष्णूभट गोडसे यांचे 'माझा प्रवास' हे वर्णनात्मक पुस्तक उपयोगाचे का आहे?
९) पर्यटनामागील कोणती प्रेरणा लोकांना पर्यटन करायला भाग पाडते?
१०) पर्यटनाचे प्रकार सांगा.
११) भौगोलिक पर्यटन का केले जाते?

१२) पर्यटनाचा विकास होण्यासाठी कोण-कोणत्या गोष्टी केल्या पाहिजेत?

१३) पर्यटन स्थळांच्या जतनासाठी लोकांनी कोणता निश्चय केला पाहिजे?

१४) हेरीटेज वॉक म्हणजे काय?

१५) भिलार गाव हे कशासाठी प्रसिध्द आहे?